पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ५

**सभावृत्तांत**

दिनांक :- २० / ०६ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - २०/०६/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. मोरेश्वर महादू भोंडवे

याशिवाय मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

विषय क्रमांक १ :- जय हनुमान व्यायामशाळा, तळवडे गावठाण सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत - मा. वनिता थोरात, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २ :- से.नं.२६ येथील महिला व्यायामशाळेसाठी व्यायामशाळेचे साहित्य मिळणेबाबत - मा. वनिता थोरात, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३ :- प्रभाग क्र.२७ मोरवाडी व्यायामशाळेसाठी व्यायामशाळेचे साहित्य मिळणेबाबत - मा. वनिता थोरात, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४ :- महापौर चषक बुध्दीबळ स्पर्धा २०१२ व महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१२ आयोजित करणेबाबत - मा. वनिता थोरात, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.मोरेश्वर भोंडवे                अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

बुधवार दिनांक ०४/०७/२०१२ दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

मा. सभापती - बुधवार दिनांक ०४/०७/२०१२ दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( थोरात वनिता एकनाथ )**
**सभापती**
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ५

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/६/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- ०४ / ०७ / २०१२ वेळ :- दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची दिनांक २०/६/२०१२ ची तहकूब सभा बुधवार दिनांक - ०४/०७/२०१२ रोजी दुपारी ३.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. बोकड रामदास गेणभाऊ
५) मा. जयश्री वसंत गावडे
६) मा. मोरेश्वर महादू भोंडवे

याशिवाय मा.गायकवाड - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०६/०६/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -

ठराव क्रमांक :- १२ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०४/०७/२०१२
सुचक :- मा. वनिता थोरात अनुमोदक :- मा. वैशाली काळभोर
संदर्भ :- मा. वनिता थोरात, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची जय हनुमान व्यायामशाळा, तळवडे गावठाण ही व्यायामशाळा एस.के.बापू युवा फाऊंडेशन, तळवडे गावठाण या संस्थेस चालविण्यास देण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १३ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०४/०७/२०१२
सुचक :- मा. वनिता थोरात अनुमोदक :- मा. वैशाली काळभोर
संदर्भ :- मा. वनिता थोरात, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१४, भक्ती-शक्ती उद्यान प्रभागातील सावरकर उद्यान ( गणेश तलाव ) से.नं.२६ येथे महिलासाठी व्यायामशाळा आणि योगासन वर्ग सुरु करावयाचे आहेत. त्यासाठी सावरकर

उद्यानात जागाही उपलब्ध आहे. सदर व्यायामशाळेस व्यायामशाळेचे साहित्य देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १४ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०४/०७/२०१२
सुचक :- मा. वनिता थोरात अनुमोदक :- मा. वैशाली काळभोर
संदर्भ :- मा. वनिता थोरात, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक २७ मोरवाडी येथील बोरा कन्स्ट्रक्शनचे मागील बाजूस महानगरपालिकेच्या व्यायामशाळेचे काम पूर्णत्वास आलेले आहे. तरी व्यायाम शाळेकरीता अद्ययावत असे व्यायामाचे साहित्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १५ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०४/०७/२०१२
सुचक :- मा. वनिता थोरात अनुमोदक :- मा. वैशाली काळभोर
संदर्भ :- मा. वनिता थोरात, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपाचे वतीने व पिंपरी चिंचवड महानगर चेस असोसिएशन यांच्या सहकार्याने माहे ऑगष्ट २०१२ मध्ये महापौर चषक बुध्दीबळ स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच पिंपरी चिंचवड म.न.पा.च्यावतीने व पुणे जिल्हा कॅरम असो. यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्रमंडळ, चिंचवड पुणे ३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१/०७/२०१२ या काळात गणेश महल भोईरनगर चिंचवड - ३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१२ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/९७२/२०१२
दिनांक :- ०५/०७/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.